# Good Work Of Nagpur Rural Police

## पोलीस अधीक्षक यांच्या शुभहस्ते ''ऑपरेशन मुस्कान '' मोहिमे अंतर्गत उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा गौरवांकित सत्कार

दिनांक १०/०८/२०१७ रोजी नागपूर (ग्रामीण) पोलीस मुख्यालय, टेका नाका येथे सकाळी ११.०० वा. च्या सुमारास नागपूर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. शैलेश बलकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली ऑपरेशन मुस्कान मोहीमे अंतर्गत उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच मिळुन आलेल्या बालक आणि पालक यांचा गौरवांकित सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सत्कार सोहळयाचे अध्यक्ष पोलीस अधिक्षक श्री. शैलेश बलकवडे, उपाध्यक्ष अपर पोलीस अधीक्षक श्री. नरसिंग शेरखाने आणि पोलीस उपअधिक्षक (गृह) श्री. कैलास गावडे, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जिल्हा महीला व बाल विकास अधिकारी श्री. विजयसिंग परदेशी, बाल संरक्षण अधिकारी श्री. मुस्ताक पठान हे उपस्थित होते.

पोलीस अधिक्षक श्री. शैलेश बलकवडे यांच्या शुभहस्ते पो.स्टे. बोरीच्या पोउपनि श्रीमती सोनाली राठोड, पो.स्टे.MIDC बोरीचे पोउपनि. श्री. नरेंद्र तायडे, पो.स्टे. कन्हानचे पोउपनि श्री. नितीन आगासे, पो.स्टे. मौदाचे पोउपनि श्रीमती आरती उघडे, पो.स्टे. रामटेकच्या सपोनि श्रीमती वर्षा मते, पो.स्टे. पारशिवनीचे पोउपनि श्री. प्रविण सोनाने पो.स्टे. काटोलचे पोउपनि गजानन तेलरांधे, पो.स्टे. नरखेडचे पोउपनि श्री. जितेश कानपुरे, पो.स्टे. कोंढाळीचे पोउपनि श्री. सचिन राठोड, पो.स्टे. भिवापूरचे पोउपनि श्री. शिवशंकर तिवारी, पो.स्टे. कुहीचे सपोनि श्री. अविनाश उपासे, पो.स्टे. वेलतुरचे पोउपनि श्री. अविनाश गोणेवार, पो.स्टे. सावनेरच्या श्रीमती पोउपनि मृणालीनी वंजारी, पो.स्टे. कळमेश्वरच्या श्रीमती पोउपनि शुभांगी ढगे, पो.स्टे. खापाचे पोउपनि श्री. बासोडे, पो.स्टे. केळवदचे पोउपनि श्री. देवेंद्र सोनावले आणि यांचे सोबत प्रत्येकी दोन पोलीस कर्मचारी यांचा पुष्पगुच्छ, प्रशस्तीपत्र आणि मिठाई देऊन गौरवांकित सत्कार करण्यात आलेला आहे.

या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमाला पोलीस अधिकारी यांनी ऑपरेशन मुस्कान दरम्यान त्यांनी केलेल्या प्रत्यक्ष कामाचा अनुभव यावेळी उपस्थित अध्यक्ष आणि प्रमुख पाहुणे यांच्या समक्ष सांगितले. ऑपरेशन मुस्कान दरम्यान रेकॉर्डवरील आणि रेकॉर्ड व्यतिरीक्त ० ते १८ वर्ष या वयोगटामध्ये २६ बालकांचा आणि १८ वर्ष वयोगटामधील ६४ असे एकुण ९० व्यक्तींचा शोध नागपूर ग्रामिण जिल्हयातील २२ पोलीस स्टेशन अंतर्गत घेण्यात आलेला आहे. पोलीस अधिक्षक यांनी ऑपरेशन मुस्कारन दरम्यान काम करणाऱ्या पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांचे कौतुक केले असुन त्यांनी यापुढेही हरविलेल्या व्यक्तींचा शोध घेण्यात यावा असे कार्यक्रमा दरम्यान सांगितले. या कार्यक्रमाची पुर्ण तयारी नागपूर ग्रामिण पोलीस मुख्यालयाचे राखीव पोलीस निरीक्षक श्री. सतिश

रींगणे यांनी केलेली होती आणि या कार्यक्रमाची रूपरेषा महिला सहायक कक्षाच्या सपोनि. श्रीमती वर्षा वंजारी आणि कर्मचारी यांनी केली

.




मुस्कान-III


ऑपरेशन मुस्कान-III 2017


ऑपरेशन मुस्कान-III 2017



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर